Session: 9

Date : 27/09/25

News : loksaiyardri

## ग्लोबल व्हिलेज स्कूल : विद्यार्थ्यांत सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी सत्र

**सोलापूर** । (कै.) ब. ई. चनशेट्टी गुरूजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणी येथे विशेष सायबर सुरक्षा जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले. राज्य सायबर विभागामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या सहकार्याने पार पडला. प्रतीक प मटोले, फिरोज शेख यांनी मार्गदर्शन केले. या विशेष सत्रात इयत्ता ८वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना इंटरनेटचा सुरक्षित वापर, ऑनलाइन फसवणूक टाळण्याचे उपाय, नेटिक्वेट्स आणि सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण याविषयी सविस्तर मार्गदर्शन मिळाले. मुख्याध्यापिका अस्मा नदाफ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अमृता कोरीशेट्टी, निलोफर सय्यद, विनायक गोविंदे यांनीही सहभाग नोंदवला.